आयुर्वेद : खंड २५

# रक्त आणि यकृत यांच्या विकारांवर आयुर्वेदीय उपचार

## अनुक्रमाणिका


卐 मनोगत ८

卐 प्रकरण

१. रक्त १०

२. पांडुरोग – ॲनीमिया १४

३. रक्तातील पांढऱ्या पेशी २७

४. रक्तपित्त – रक्तस्राव ३१

५. रक्तस्राव – आधुनिक वैद्यकशास्त्राप्रमाणे ३५

६. यकृत (लिव्हर) ५०

७. कावीळ ५४

८. हिपॅटायटिस ५७

९. कावीळ (आयुर्वेदीय दृष्टिकोन) ६४

१०. मद्यपान व त्यामुळे होणारे रोग ७२

११. यकृत व प्लीहा वृद्धि ७८

१२. सिऱ्होसिस ऑफ लिव्हर (यकृतोदर) ८२

१३. शोथ – सूज ८७

१४. जलोदर १०१

१५. यकृताचे रोग होऊ नयेत म्हणून प्रतिबंधक उपाय १०६

## मनोगत

आयुर्वेदानुसार गर्भावस्थेत यकृत (लिव्हर) व प्लीहा (स्प्लीन) रक्तापासून - रक्तधराकलेपासून निर्माण होतात. आधुनिक वैद्यकशास्त्राप्रमाणेही गर्भावस्थेत सुरुवातीला यकृत व प्लीहा यांपासून रक्त निर्माण होते. याचा अर्थ रक्त आणि यकृत व प्लीहा यांचा जन्मापूर्वीपासूनच अगदी निकटचा संबंध आहे.

आयुर्वेदाने रक्तातील पेशींचा रक्तधातूत व रक्तातील द्रव्यांचा (plasma) रसधातूत अंतर्भाव केला आहे. आयुर्वेदाने रक्ताला जीव असे म्हटले आहे. 'प्राणाः शोणितं अनुवर्तन्ते :' म्हणजे 'रक्त प्राणवायु वाहून नेण्याचे काम करते व सर्व पेशींना प्राणवायु पुरविते', हे पाच हजार वर्षांपूर्वी माहीत होते.

रक्त कमी झाल्यास प्राणशक्ति कमी होते व सर्व पेशींचे कार्य मंदावते. भारतात ७०% गरोदर स्त्रियांत व मुलांत आणि ४०% पुरुषांत हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असते. ॲनीमियामुळे त्यांची कार्यक्षमता व रोगप्रतिकारकशक्ति कमी होते.

रक्तातील लोहाचे प्रमाण कमी होणे, याला आधुनिक वैद्यकशास्त्रात ॲनीमिया व आयुर्वेदात पांडुरोग असे म्हणतात. पंडु म्हणजे पांढरा. पांडुरोग म्हणजे ज्या रोगात रुग्णाची त्वचा व अंतस्त्वचा पांढरी दिसते तो. रक्तस्राव होण्याची प्रवृत्ति असलेल्या रोगाला आयुर्वेदात (Bleeding disorders) रक्तपित्त असे म्हणतात.

लिव्हरला संस्कृतमध्ये यकृत असे म्हणतात. दोन्ही शब्दांचे अर्थ लक्षात ठेवण्यासारखे आहेत. Life depends on liver. लिव्हरवर आपले जीवन अवलंबून असते व आपण कसे जगतो यावरही आपले जीवन अवलंबून असते, असे लिव्हर या शब्दाचे दोन अर्थ होतात. यकृत या शब्दाचा अर्थ 'यः करोति', म्हणजे जे शरीरात महत्त्वाचे कार्य करते ते यकृत, असा होतो. भारतात आयुर्वेदाचा अभ्यास न केलेले काही जण काविळीवर दिली जाणारी परंपरागत एक-दोन औषधे सर्व प्रकारच्या

काविळींवर देतात. अशा व्यक्तींकडून उपचार करून घेऊ नये; कारण काविळीची अनेक कारणे असून त्यांचे उपद्रव वगैरेंची माहिती अशा उपचार करणाऱ्यांना नसते.

मद्य हा यकृताचा शत्रु आहे. काही दारुड्यांच्या माध्यमातून भुते आपली दारू पिण्याची इच्छा तृप्त करून घेत असल्यामुळे, उत्कट इच्छा असूनही दारूचे व्यसन सोडणे काहींना खूप कठीण जाते. यकृताचे रोग होऊ नयेत म्हणून प्रतिबंधक उपायही आयुर्वेदात दिले आहेत.

हे पुस्तक रक्त व यकृताचे रोग झालेल्या रुग्णांना उपयोगी पडेलच; शिवाय लिव्हर स्पेशालिस्ट, हिमॅटोलॉजिस्ट, वैद्य, डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी व परिचारिका यांनाही उपयोगी पडेल. सर्वांनीच या पुस्तकाचा अभ्यास करून व त्यातील नियम पाळून आपले रक्त शुद्ध व सारवान ठेवावे आणि आपले यकृत आरोग्यसंपन्न ठेवावे, अशी नम्र विनंति. – **लेखक**

## आयुर्वेदात मद्यपान आणि मांसाहार यांविषयी उल्लेख असल्याचे कारण

आयुर्वेद हे एक शास्त्र असल्यामुळे सर्व पदार्थांसह मांस आणि मद्य यांच्या गुणांचे वर्णनही यात आले आहे. ‘या पदार्थांचा दैनंदिन जीवनात वापर करणे’, हे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे आयुर्वेदातही निषिद्धच मानले आहे. व्यक्तीचे प्राण वाचवण्यासाठी शेवटचा पर्याय म्हणूनच यांचा उपयोग करण्याची पद्धत आयुर्वेदात पूर्वापार चालत आली आहे. प्रस्तुत ग्रंथात मांस आणि मद्य यांचे गुण आणि उपयोग यांचा आलेला उल्लेखही याच संबंधाने आहे.

---

प्रस्तुत ग्रंथात ठिकठिकाणी दिलेले काढे, घृत (औषधसिद्ध तूप), वटी (गोळ्या) इत्यादी औषधी कल्प कसे बनवावेत, यासंबंधीची सविस्तर माहिती सनातनचा ग्रंथ ‘औषधशास्त्राची मूलतत्त्वे आणि औषधनिर्मिती’ यात दिली आहे.